निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २२१ वा.
मंगळवार -१४ ऑक्टोबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## एकनाथ शिंदेंच्या कार्यकाळातील ती योजना बंद होणार नाही; शासनाचं स्पष्टीकरण

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/ 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा'** या स्पर्धात्मक अभियानास दोन वर्षात मोठा प्रतिसाद लाभला आहे. २०२५-२६ मध्ये हे अभियान राबविण्यासाठी ८६.६३ कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असून सुधारित निकष आणि नवीन उपक्रमांसह या अभियानाचा तिसरा टप्पा राबविण्याच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरू असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली. सन २०२५-२६ या वर्षाकरीता 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियान राबविताना या अभियानाच्या निकषांमध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. यावर्षीही अभियानासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आल्याची माहिती शासनाकडून देण्यात आली आहे. दरम्यान, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या कार्यकाळात सुरू झालेली ही योजनाही बंद झाल्याचे वृत्त माध्यमांत झळकले होते. त्यानंतर, शासनाने सुधारित निकषांसह हे अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती दिली.

यंदाच्या वर्षामध्ये सदर अभियान सुधारित निकषांसह राबविण्याच्या अनुषंगाने सर्व संचालकांशी समन्वय साधून सविस्तर प्रस्ताव सादर करण्याबाबत आयुक्त (शिक्षण) यांना कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने २०२५-२६ या वर्षाकरीता 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' टप्पा-३ अभियान राबविण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त (शिक्षण) यांच्यामार्फत २९ ऑगस्ट २०२५ रोजी शासनास प्राप्त झाला आहे. या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरू असून हे अभियान नवीन उपक्रमांसह राज्यभरात राबविण्यात येणार आहे.शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या ३० नोव्हेंबर २०२३ च्या शासन निर्णयान्वये २०२३-२४ मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' हे स्पर्धात्मक अभियान राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांकरीता १ जानेवारी २०२४ ते १५ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत राबविण्यात आले. या अभियानास विद्यार्थी व शिक्षकांबरोबरच




माजी विद्यार्थी, पालक व शिक्षणप्रेमी नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. ९५ टक्के शाळांमधील सुमारे दोन कोटी विद्यार्थी या अभियानांतर्गत विविध उपक्रमात सहभागी झाले होते. या अभियानातील काही उपक्रमांची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये देखील झाली आहे.

२०२४-२५ मध्ये देखील 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' टप्पा-२ हे स्पर्धात्मक अभियान काही नवनवीन उपक्रमांसह २६ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये २९ जुलै २०२४ ते १५ सप्टेंबर २०२४ या कालावधीत राबविण्यात आले. १८ नोव्हेंबर २०२४ व ९ जानेवारी २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये पारितोषिकाची ७३.८२ कोटींची रक्कम वितरीत करण्यात आली आहे. सदर अभियानास २०२३-२४ प्रमाणेच मोठा प्रतिसाद मिळाला. आता २०२५-२६ या वर्षाकरिता 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' हे स्पर्धात्मक अभियान राबविण्याच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरू असून सदर अभियान नवीन उपक्रमांसह राज्यभरात राबविण्यात येणार असल्याचे शालेय शिक्षण विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

## पळशी येथील अंगणवाडीत पोषण आहारात किड्यांचे साम्राज्य! भ्रष्टाचार मुळाशी..

**आत्ताच एक्सप्रेस**

**आष्टी / प्रतिनिधी/** पळशी येथील अंगणवाडीत लहान बालकांना देण्यात येणाऱ्या पोषण आहारात किडे आढळल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे पालकांमध्ये आणि ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.मुलांच्या आरोग्यासाठी देण्यात येणाऱ्या आहारात किडे असल्याचे दिसून येताच अंगणवाडी सेविका आणि पालकांनी तातडीने प्रशासनाचे लक्ष वेधले.संबंधित आहाराचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले असून, दोषींवर कारवाईची मागणी करण्यात येत आहे.

या घटनेमुळे अंगणवाडीतील स्वच्छता आणि पोषण आहार पुरवठा याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. बालकांच्या आरोग्याशी संबंधित अशा घटनांवर तात्काळ व कठोर कारवाई करावी, अशी मागणी मिना मोटे यानी केली आहे.

**पोषण आहारामध्ये किडे व आळ्या आहेत त्यावेळेस पळशी ग्रामपंचायतचे सदस्य मीना मोटे यांनी जाऊन स्वतः पाहणी केली व हा पोषण आहार देऊ नका असे सेविका व शिक्षका यांना सुचवले आणि मिना मोटे यानी स्वता:च्या घरून गहू आणून दिले आहाराचे काम निरंतर पुढे चालु ठेवले. आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ठेकेदार यांची चौकशी करून त्याच्यावर कारवाई करण्यात यावी असे यांनी सांगितले.**



## दहावी, बारावीची परीक्षाच्या बोर्डाकडून तारखा जाहीर!

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/**महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेच्या तारीख जाहीर केल्या आहेत. फेब्रुवारी मार्च २०२६ परीक्षेच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ दरम्यान बारावीची परीक्षा होणार आहे. २० फेब्रुवारी ते १८ मार्च दहावीची परीक्षा होणार आहे. लेखी परीक्षेच्या तारखा जाहीर झाल्या आहेत.महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (एमएसबीएसएचएसई) दहावी (एसएससी) आणि बारावी (एचएससी) परीक्षांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. लाखो विद्यार्थ्यांसाठी हे वेळापत्रक महत्त्वाचे ठरले असून, फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये परीक्षा घेण्यात येतील. लेखी परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक लवकरच उपलब्ध होईल, ज्यामुळे विद्यार्थी आणि पालकांना तयारीसाठी पुरेसा वेळ मिळेल. मंडळाने पारदर्शकतेसाठी हे वेळापत्रक आधीच प्रसिद्ध केले आहे.

**बारावी परीक्षांचा कालावधी**

बारावी परीक्षा १० फेब्रुवारी २०२६ पासून सुरू होऊन १८ मार्च २०२६ पर्यंत चालेल. या कालावधीत विज्ञान, वाणिज्य, कला आणि व्यावसायिक शाखांच्या विषयांच्या लेखी परीक्षा घेतल्या जातील. व्यावहारिक परीक्षा जानेवारीच्या शेवटी किंवा फेब्रुवारीच्या सुरुवातीला होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांनी विषयवार अभ्यासक्रम पूर्ण करून सराव परीक्षा द्याव्यात.

**दहावी परीक्षांचा कालावधी**

दहावी परीक्षा २० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ पर्यंत आयोजित केली जाईल. या परीक्षेत गणित, विज्ञान, भाषा आणि सामाजिक शास्त्र



यांसारखे प्रमुख विषय समाविष्ट असतील. मंडळाने परीक्षांच्या सकाळ आणि दुपारच्या सत्रांचे वेळापत्रक लवकर जाहीर करण्याचे संकेत दिले आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांना वेळ व्यवस्थापन सुलभ होईल.

लेखी परीक्षा

जाहीर केलेल्या तारखा मुख्यतः लेखी परीक्षांसाठी आहेत. व्यावहारिक, तोंडी आणि आंतरिक मूल्यमापन जानेवारीत पूर्ण होईल. मंडळाने परीक्षा केंद्रांची यादी आणि हॉल टिकट वितरणाची प्रक्रिया लवकर सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. विद्यार्थ्यांनी अधिकृत वेबसाइट ारहरहींललेरीव.ळप वरून अपडेट्स तपासावेत.

**कशी कराल तयारी?**

हे वेळापत्रक जाहीर झाल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पाच महिने मिळतील. मंडळाने सॅम्पल प्रश्नपत्रिका आणि अभ्यास साहित्य उपलब्ध करवले आहे. पालक आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांना तणावमुक्त राहण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. ऑनलाइन आणि ऑफलाइन कोचिंग क्लासेसचा फायदा घ्यावा.

**निकाल कधी?**

परीक्षा संपल्यानंतर निकाल मे-जून २०२६ मध्ये अपेक्षित आहेत. पूरक परीक्षा जुलैमध्ये होऊ शकतात. मंडळाने नोंदणी प्रक्रियेत बदल करून डिजिटल पद्धती मजबूत केली आहे. विद्यार्थ्यांनी नियमांचे पालन करून यश मिळवावे, ज्यामुळे भविष्यातील करिअरला दिशा मिळेल.

## पदभरतीसाठी दिव्यांगांचे वैश्विक ओळखपत्र अनिवार्य

**आत्ताच एक्सप्रेस/ मुंबई/ प्रतिनिधी/** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार, राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय तसेच इतर सर्व संस्थांमधील विविध पदभरतीसाठी दिव्यांग उमेदवारांसाठी वैश्विक ओळखपत्र अनिवार्य करण्यात आले आहे, याबाबतचा शासन निर्णय दिव्यांग कल्याण विभागाने निर्गमित केला आहे.विविध शासकीय, निमशासकीय व इतर सर्व प्राधिकरणे, संस्था इत्यादीमध्ये पदभरतीसाठी अर्ज घेताना दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असलेल्या जागांसाठी संबंधित दिव्यांग व्यक्तींच्या वैश्विक ओळखपत्राचा क्रमांक नोंदविणे तसेच प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. सर्व मंत्रालयीन विभाग तसेच त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व आस्थापना, विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख तसेच स्वायत्त संस्था यांना त्यांच्या आस्थापनेवर दिव्यांग आरक्षणांतर्गत सेवेत असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.जे दिव्यांग अधिकारी, कर्मचारी दिव्यांग आरक्षणांतर्गत नियुक्ती, पदोन्नती व अन्य शासकीय योजनांचा आणि सवलतींचा लाभ घेत आहेत, अशा सर्व दिव्यांग अधिकारी, कर्मचारी यानी दिव्यांगत्व प्रमाणपत्र, वैश्विक ओळखपत्र सादर केले आहे किंवा नाही याची तपासणी करुन त्यांच्या दिव्यांगत्वाची पडताळणी करण्यात यावी.

## एसटी कर्मचाऱ्यांना ६ हजार रुपये दिवाळी भेट - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** एसटीच्या ८५ हजार कर्मचारी व अधिकाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून ६ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे जाहीर केला. तसेच, वेतनवाढीचा फरक वेतनासोबत देण्यासाठी महामंडळाला दरमहा ६५ कोटी रुपये देण्याचा आणि पात्र कर्मचाऱ्यांना दिवाळी अग्रीम म्हणून १२ हजार ५०० रुपये देण्याचाही निर्णय घेण्यात आला.

एसटीच्या सर्व कर्मचारी संघटनांची आणि कृती समितीची बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे झाली, त्यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. बैठकीस परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नविन सोना, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, सहसचिव राजेंद्र होळकर तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, राज्यात अतिवृष्टीमुळे बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. सरकार शेतकरी बांधवांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले आहे. एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी देखील गोड झाली पाहिजे म्हणून शासनाने हा निर्णय घेतला आहे. एसटीला आर्थिकदृष्ट्या समृद्ध करणे गरजेचे आहे. एसटी महामंडळाचे उत्पन्न वाढण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यासाठी खासगी शासकीय सहभागी तत्वावर एसटी महामंडळाच्या जागांचा विकास करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून ६ हजार रुपये देण्यासाठी शासनाने ५१ कोटी रुपये अनुदान देण्याचे मान्य केले आहे. तसेच २०२०-२४ दरम्यानच्या वेतन फरकाची वाढीतील रक्कम कर्मचाऱ्यांना दरमहा वेतनासोबत देण्यात येणार असून यासाठी शासनाने ६५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. याबरोबरच जे पात्र कर्मचारी सण अग्रीम घेण्यास इच्छुक आहेत त्यांना देखील पूर्वीप्रमाणे १२ हजार ५०० रुपये देण्यात येणार आहेत त्यासाठी शासनाकडे ५४ कोटी रुपयांची मागणी एसटी महामंडळाने केली आहे, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

### ओबीसीचा डीएनए आहे असे म्हणणाऱ्या दगाबाजांना

## ओबीसी धक्का न लावता ओबीसी ओबीसीलाच मतदान करणार-प्राध्यापक लक्ष्मण हाके





**आत्ताच एक्सप्रेस**

**परतूर/ प्रतिनिधी/** परतूर उपविभागीय कार्यालय येथे ओबीसी भटके विमुक्त महासंघाच्या वतीने २ सप्टेंबर २०२५ च्या मराठा समाजाला ओबीसी आरक्षण देण्याच्या निषेधार्थ शासनाच्या विरोधात भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राध्यापक लक्ष्मण हाके बोलत होते. परतुर येथे रेल्वे स्टेशन पासून ते तहसील कार्यालय पर्यंत या मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले होते.या मार्च्यात हाजोरोंच्या संख्याने ओबीसी रस्त्यावर उतरलेला दिसला. मंडल आयोगाच्या माध्यमातून सामाजिक मागासपण दूर करण्यासाठी देशातील मागास जातींना प्रतिनिधित्व मिळावे म्हणून इतर मागासवर्ग प्रवर्गात आरक्षणाची तरतूद झाली. बारा बलुतेदार १८ आलोतेदार यांना सामाजिक प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे व त्यांना माणूस म्हणून जगता आले पाहिजे हा या आरक्षणाचा मुख्य उद्देश यातून कुठेतरी या बलुतेदारांचे प्रतिनिधी शिक्षण, नोकऱ्या आणि राजकारणात प्रतिनिधित्व करू लागले पण २ सप्टेंबर २०२५ च्या शासन आदेशानुसार मूळ ओबीसीची चे अस्तित्व शासनाने धोक्यात आणले आहे.

त्या अनुषंगाने सरकारने जरी आरक्षण धोक्यात आणले असले तरी परंतु उद्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत एससी, एसटी यांना या आरक्षण मध्ये घटकांना सोबत घेऊन सर्वसाधारण च्या जागावर सुद्धा निवडणूक लढवेल व दोन सप्टेंबर २०२५ चा शासन निर्णय म्हणजे मूळ ओबीसी प्रवर्गासाठी काळा कायदा आहे. अशा प्रकारचे वक्तव्य प्राध्यापक लक्ष्मण हाके परतूर येथील विराट मोर्च्याला संबोधीत केले.याप्रसंगी ओबीसी नेते नवनाथ आबा वाघमारे, श्रीमती सविताताई मुंडे ,प्राध्यापक विठ्ठल तळेकर ,बटुळे मामा यांनीही मार्गदर्शन केले याप्रसंगी करवंडे सर,परमेश्वर खरात, अशोकराव गाव सौंदर्य मधुकर झरेकर, भागवत कडपे ,परमेश्वर पोटे ,सुभाष जाधव ,डॉक्टर त्रिभुवन ,नामदेव नाचन, शेख जमीर ,परमेश्वर ढवळे ,तुकाराम जईद ,बाळू गाते ,राधाकिसन माने ,रुस्तुमराव कुंड ,माऊली हजारे ,सुनील पोटे ,सिद्धार्थ पोटे ,गोरख गोटे ,अमोल आगळे, बाबासाहेब झरेकर ,बाळ आनंद गाढवे ,अभिमन्यू गाढवे ,ओम प्रकाश गाढवे ,गणेश आंबेकर ,सुदर्शन राऊत ,शिवाजीराव इंगळे इतर ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे संयोजक रामप्रसाद थोरात यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परमेश्वर पोटे यांनी केले शासनाच्या वतीने उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड यांनी निवेदन स्वीकारले.

# नाशिकच्या पालकमंत्रीपदाचा कधी सोडणार तिढा ?

नाशिकच्या पालकमंत्रीपदाचा तिढा अद्यापही सुटण्याचं नाव घेत नाहीय. नाशिकच्या पालकमंत्रीपदावर महायुतीमधील तिन्ही पक्षांचा दावा आहे. त्यातच आता नाशिकच्या पालकमंत्रीपदासाठी मंत्रीच हतबल झाल्याचं दिसतंय.नाशिकचं पालकमंत्रीपद हे महायुतीसाठी डोकेदुखी झालेलं आहे. आता तर चक्क मंत्री महोदयही पालकमंत्रीपदावरून हतबल झाल्याचं दिसतंय. शेतक-यांना मदत मिळेल, लाडक्या बहिणींना त्यांचे पैसे मिळतील. मात्र पालकमंत्रीपदाबाबत नाही सांगता येणार नाही, असं विधान मंत्री गिरीश महाजन यांनी केलंय.तर काही दिवसांपूर्वी मंत्री दादा भुसे यांनीही यावरून मिश्किल टिप्पणी केली होती. नाशिकच्या पालकमंत्रीपदाचा वाद थेट डोनाल्ड ट्रम्प यांच्या दरबारी न्यावा लागणार असल्याचं मिश्किल वक्तव्य दादा भुसेंनी केलं होतं.

दरम्यान सगळं काही होईल, शेतकऱ्यांना मदत मिळेल, लाडक्या बहिणींना त्यांचे पैसे मिळतील, पण दिवाळीपूर्वी नाशिकचा पालकमंत्री जाहीर होणार नाही,'' अशा शब्दांत मंत्री गिरीश महाजन यांनी नाराजी व्यक्त केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी १८ जानेवारी रोजी पालकमंत्र्यांच्या नियुक्तीची घोषणा केली होती. यात नाशिक जिल्ह्यासाठी भाजप नेते मंत्री गिरीश महाजन यांची पालकमंत्र म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मात्र या निर्णयाला शिवसेना नेत्यांकडून विरोध झाल्यामुळे अवघ्या एका दिवसातच पालकमंत्रीपदाची घोषणा स्थगित करण्यात आली होती. यानंतर अद्यापही महायुतीत नाशिकच्या पालकमंत्रीपदाचा तिढा कायम आहे. १५ ऑगस्टच्या ध्वजारोहणाच्या निमित्तानंही पालकमंत्रीपदाचा वाद उफाळून आला होता. आता पुन्हा एकदा नाशिकच्या पालकमंत्रीपदावरून मंत्रीच हतबल झालेले दिसताहेत. त्यामुळे हा वाद कसा मिटवला जाणार, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# दिवाळीतील आनंदाचा शिधा गेला कुठे ?

दिवाळी म्हणजे वर्षातुन येणारा एक महत्त्वाचा आणि आनंदाचा सण असतो. त्याचप्रमाणे दिवाळीला सर्वत्र झगमगाट व उत्साहाचे वातावरण दिसून येते.परंतु सरकारने आनंदाचा शिधायोजनेवर ब्रेक लावल्याने गोरगरिबांच्या सणांमध्ये ब्रेक लागुन अंधक्काराचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येते.२०२२ पासून सरकारने आनंदाचा शिधा हा उपक्रम राबविला होता. परंतु या उपक्रमाला आता ग्रहण लागल्याचे दिसून येते.

त्यामुळे गेल्या दीड वर्षापासून दिवाळीत मिळणारा आनंदाचा शिधा सरकारने बंद करून गोरगरीब जनतेवर मोठा अन्याय केल्याचे दिसून येते.निवडणुका झाल्या आणि मुख्यमंत्री बदलला म्हणजे योजनाही बदलतात की काय असे वाटायला लागले आहे.तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या महायुती सरकारने २०२२ मध्ये आनंदाचा शिधाहा उपक्रम सुरू केला होता.या योजनेत केवळ १०० रूपयामध्ये एक किलो साखर, एक किलो चणाडाळ, एक लिटर खाद्यतेल व एक किलो रवा असे आवश्यक साहित्य दिले जात होते. परंतु गेल्या दीड वर्षापासून या योजनेला सरकारने खो दिला आहे.परंतु गोरगरीब लाभार्थ्यांना आताही अपेक्षा आहे की दिवाळीचा शिधा मिळेल.परंतु सध्यातरी असे वाटत नाही की सरकार लाभार्थ्यांना आनंदाचा शिधादेईल.आताही ८० टक्के शिधापत्रिकाधारक आनंदाचा शिध्याच्या प्रतीक्षेत आहेत. सरकारला समजायला पाहिजे की महागाईने अक्राळविक्राळ रूप धारण केले आहे अशा परिस्थितीत सणासुदीला सरकारने जनतेच्या जखमेवर फुंकर घालायची तर मीठ चोळण्याचे काम करतांना दिसत आहे आणि या कठीण परिस्थितीचा सामना गरीब व सर्वसामान्यांना मोठ्या प्रमाणात करावा लागतो आहे.परंतु सणासुदीच्या दिवसांत जर सरकार गरीबांचा आधार बनत नसेल तर अशा योजनांचा काय फायदा!आनंदाचा शिधा बंद केला म्हणजे राज्यात सर्वच काही ठीक आहे असे म्हणता येणार नाही. कारण राज्यातील संपूर्ण जनता राजकीय पुढाऱ्यांसारखी श्रीमंत नाहीत.

अत्योदय कार्डधारक, प्राधान्य कुटुंबकार्डधारक अशाप्रकारे संपूर्ण शिधापत्रिकाधारक यांना ऐन सणासुदीच्या काळात सरकारने सुरू केलेली योजना अचानक बंद करीत असेल तर गरीबांच्या व शिधापत्रिकाधारकांच्या पायावर कुऱ्हाड मारण्याचे काम सरकार करीत आहे असेच म्हणावे लागेल.कारण राज्यात अतिवृष्टीमुळे मराठवाडा, कोकण, विदर्भासह अनेक क्षेत्र प्रभावीत झाले आहेत प्रामुख्याने ३६ जिल्ह्यांपैकी ३१ जिल्हे जास्त प्रभावीत होवून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहेत.त्यांना सरकारने सर्वोतोपरी मदत करावी आणि केलीच पाहिजे. परंतु अशा कठीण प्रसंगी सरकारच्या योजनेअंतर्गत दिला जाणारा आनंदाचा शिधा शेतकऱ्यांना व शिधापत्रिकाधारकांना सरकारने ताबडतोब द्यायला हवा.यामुळे थोडा का होईना दिवाळीचा सण साजरा करण्यास मदत होईल असे मला वाटते. गोरगरीबांच्या दृष्टीकोनातून विचार केला तर महागाईच्या काळात हा शिधा दिलासा देणारा ठरत होता.

शंभर रूपयात मिळणारे पॅकेज सणाचा गोडवा वाढवत असे.मात्र गणेशोत्सव, नवरात्र, दसरा संपूनही शिधा वाटप झालेला नाही आणि आता दिवाळीला सरकार शिधा वाटप करते की नाही यात मोठी शंका निर्माण होत आहे.कारण दिवाळी फक्त आठ दिवसांवर येऊन ठेपली आहेत आणि सरकारने आनंदाचा शिधा कुठे नेऊन ठेवला अजुनही कळेनासे झाले आहे.त्यामुळे आनंदाचा शिधा अधांतरी असल्याचे स्पष्ट दिसून येते. राज्यात पैशाला काहीच कमी नाही कारण राज्यातील मुठभर आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांजवळ करोडों रूपयांची अमाप चल-अचल संपत्ती आहे.त्यांनी जर खरोखरच समाजाला मदत करण्याचे ठाणले तर अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई व शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा सहज देवु शकतात यात तिळमात्र शंका नाही.परंतु या करीता मोठे काळीज हवे परंतु ते राजकीय पुढाऱ्यांनमध्ये दिसतं नाही ही महाराष्ट्राची राजकीय पुढाऱ्यांच्या प्रती शोकांतिका म्हणावी लागेल. राजकीय पुढारी फक्त नावालाच लोकप्रतिनिधी, जनप्रतिनीधी व समाजसेवक आहेत कृतीत मात्र प्रश्नार्थक चिन्ह उपस्थित होतो.

मागील दिवाळीत अंत्योदय प्राधान्य व शेतकरी कुटुंब योजनेतील लाभार्थ्यांना रेशन दुकानातुन साखर,तेल,रवा, चणाडाळ, मैदा,व पोहे देण्यात आले होते.मात्र यंदा शासनस्तरावर यांच्यासाठी कोणताही निर्णय झालेला दिसत नाही ही सुद्धा गंभीर बाब आहे. त्यामुळे सरकारला विनंती आहे की वाढती महागाई, शेतकऱ्यांवर आलेली आपत्तीजनक परिस्थिती या संपूर्ण गोष्टींचा विचार करून दिवाळी साजरी करण्याच्या दृष्टीने सरकारने ताबडतोब आनंदाचा शिधा वाटप सुरू केले पाहिजे.जय हिंद.

**- लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**

# ई-कचऱ्याविषयी जागरूकता हवी

आज १४ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक ई कचरा दिवस म्हणून साजरा केला जातो. ई कचरा कमी करणे आणि ई कचऱ्याचा पुनर्वापर या बाबत जनजागृती करणे हा या दिवसा मागचा उद्देश आहे. २०१८ साली पहिल्यांदा जागतिक कचरा दिवस साजरा करण्यात आला. पर्यावरण आणि मानवी आरोग्यासाठी धोकादायक असलेला ई कचरा ही जगातील आज सर्वात मोठी समस्या बनली आहे. आपल्या रोजच्या जगण्यामध्ये इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल सेवांचा वापर जसा वाढत चालला आहे तसतसा इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा डोंगरही वाढत चालला आहे. उपयुक्तता संपलेल्या आणि तांत्रिक बिघाडामुळे वापरण्यायोग्य नसलेल्या वस्तू फेकून दिल्या जातात आणि मग त्याचा ई कचरा बनतो. फक्त महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रात दरवर्षी ५० हजार टन हून अधिक ई कचरा जमा होतो तर देशात ५ लाख टन ई कचरा वर्षाला तयार होतो. महाराष्ट्र खालोखाल आंध्र प्रदेश, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यात सर्वाधिक ई कचरा तयार होतो. आपल्या देशातच इतका ई कचरा तयार होत असेल तर जगात किती ई कचरा तयार होत असेल याचा विचार न केलेलाच बरा. ई कचऱ्याची समस्या इतकी गंभीरपणे आ वासून उभी असतानाही आपण ई कचऱ्या विषयी जागृत नाही. काहींना तर ई कचरा म्हणजे काय हे देखील माहीत नाही. ई कचरा म्हणजे तुमच्या आमच्या घरातील निकामी झालेल्या किंवा वापरात नसलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तू ज्या सहजपणे आपण इतर कचऱ्यासोबत बाहेर फेकतो. या कचऱ्याचा निचरा देखील आपण इतर कचऱ्या प्रमाणेच करतो. घरगुती वापरातील टीव्ही, टेप, रेडिओ, टू इन वन, फ्रिज, मिक्सर, वॉशिंग मशीन, कुलर, एअर कंडिशनर, इलेक्ट्रॉनिक कुकर, मायक्रोव्हेव, ओव्हन, हीटर, पंखे यासारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तू निकामी झाल्या की त्याला ई कचरा असे संबोधले जाते. यासोबतच महिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उपकरणे जसे संगणक, लॅपटॉप, टॅब, फोन, मोबाईल, बॅटरी, सर्किट बोर्ड, हार्ड डिस्क, पेन ड्राईव्ह, सिडी, व्ही सिडी यांचा ई कचऱ्यात समावेश होतो. अशा प्रकारे निकामी झालेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंना ई कचरा असे म्हणतात. इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये भरपूर प्रमाणात सजीवांना अपायकारक घटक असतात. हे अपायकारक घटक पर्यावरणातील हवा, मती आणि पाण्यात मिसळले की सभोतालची हवा, पाणी आणि माती दूषित होती. मोबाईलची किंवा कोणत्याही बॅटरीची निर्मिती शिसे वापरून केली जाते. हे शिसे पावसाच्या पाण्यात झिरपून हवेतील आर्द्रतेमध्ये मिसळून संबंधित हवा, पाणी आणि दूषित होते. अमेरिकेतील एका पर्यावरण संवर्धन संस्थेच्या म्हणण्यानुसार दरवर्षी ३० दशलक्ष संगणक निकामी झाले की फेकून दिले जातात. यापैकी वीस टक्क्यांहून कमी संगणकाचे पूनार्विनिकरण केले जात नाही. युरोपमध्ये तर दरवर्षी सुमारे १०० दशलक्ष फोन फेकून दिले जातात. कालबाह्य ठरलेली, निकामी झालेली ही उपकरणे पर्यावरणातील जागा वेगाने व्यापत आहेत. निष्काळजीपणे फेकलेल्या काही उपकरणांमध्ये बोरोलियम, कॅडीमियम, पारा आणि शिसे यासारखी घातक घटक असतात. या घटकांना वातावरणात संमिश्र होण्यास अवकाश लागत असला तरी खूप जास्त प्रमाणात जेंव्हा हे वातावरणात मिसळले जातात तेंव्हा पर्यावरणाची मोठी हानी होते. एकूणच ई कचऱ्यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. हे लक्षात घेता ई कचऱ्याच्या समस्येवर वेळीच आणि गांभीर्याने विचार करण्याची नितांत गरज आहे. ई कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट प्रक्रिया अवलंबणे आवश्यक आहे. त्याचा निचरा इतर कचऱ्यासोबत न करता त्याचा निचरा करण्यासाठी भिन्न प्रक्रिया राबवली पाहिजे. ई कचऱ्याचे नियोजन आणि विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेत या कचऱ्याचे संकलन त्याचे रिसायक्लिंग आणि त्याचे मॅन्यूफॅकचरिंग महत्वाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक व खाजगी क्षेत्राने संयुक्त रुपात पायाभूत सुविधा उभाराव्या लागतील. पर्यावरण मंत्रालयाने सादर केलेल्या ई कचरा व्यवस्थापन नियम २०२२ च्या मसुद्यात ई कचरा व्यवस्थापनामध्ये उत्पादक, पुनर्वापर संस्था आणि संघटना सर्वांची जबाबदारी निश्चित केली गेली आहे. ती जबाबदारी प्रत्येक घटकाने पार पाडल्यास काही प्रमाणात ही समस्या मिटेल.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# आंबेडकरी चळवळीसमोरील आव्हाने आणि उपाय

बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ ही मुख्यतः समाजवादी समाज निर्मिण्याच्या स्वप्नाची प्रेरणा देणारी एक सामाजिक चळवळ होती. दलितांच्या राजकिय चळवळीनी विचारवंतांना लक्ष देणे भाग पाडले आहे. डॉ. बाबासाहेबांनी विविधांगी जीवनांत मिळाले त्याचे मिळेल तेवढे, मिळेल तेव्हा सहकार्य सर्वांचे घेतले. पण त्यांच्या आणि त्यापैकी प्रत्येकांच्या मर्यादांची तीव्र जाणीव त्यांना सतत होती-बोचत होती आणि म्हणुनच डॉ. आंबेडकर कोणाचे झाले नाहीत, ते आपण-आपलेच एकटेच...म्हणजे शुद्र-अतिशुद्रांचेच राहिले आणि त्याबद्दचा कडवा अभिमान त्यांनी दिमाखाने सतत जन्मभर मिरविला ! महात्मा फुल्यांकडुन त्यांनी स्फुर्ती घेतली, आच घेतली. पण परिस्थितीनुसार मार्ग मात्र त्यांचा त्यांनाच शोधुन काढावा लागला. अक्षरक्ष: काटयाकुटयातून, खाच-खळग्यांतून, चढ-उतारातून, डोंगर-दऱ्यातून, नदी-नाल्यातून, वाऱ्या-वादळातून, पाण्या-पावसातून, रखरखत्या भयाण एकाकी वाळवंटातून ही वाट त्यांनी खोदून-खणून काढली आणि कोटयावधी अनुयायांनाही त्यांनी त्या वाटेने अक्षरक्ष: बांधून, धरून-ओढुन कधी कधी फरफटत सुध्दा नेले. डॉ. बाबासाहेबांना सतत चटके बसत राहिले आणि त्यांनीही सतत सगळयांना चटके दिले. बाबासाहेबांचे संपूर्ण जीवन हा एक चिरंतन संघर्ष होता. संघर्ष आणि समन्वय हे त्यांच्या चळवळीचे प्रमुख सुत्र होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमध्ये एक जाणीव मात्र रोकडया खडतर अनुभवामुळे सतत सलत राहिली-ती म्हणजे शुद्र-अतिशुद्राची (जी फक्त सर्वार्थाने त्याची त्यालाच जाणवते, इतरांची जाणीव - सहानुभुती कदाचित खरी असली तरी तिच्या मर्यादाच जास्त खऱ्या असतात. अगदी हार्दिक म्हटली तरी ती सहनुभूती खरोखर बरीचशी काल्पनिक किंवा उसनीच असते) हा अनुभव फार कडवट आहे. ही जाणीव फार भयंकर आहे, पण सत्यच तसे आहे, वस्तुस्थितीच तशी आहे. म्हणुन डॉ. आंबेडकरांनी शुद्र-अतिशूद्रामध्ये धगधगता स्वाभिमान जागविला. त्यांना स्वावलंबनाची कठोर दीक्षा दिली. इतरांची खरीखुरी सहानुभुती असली तर तिचा त्यांनी मनोमन आदर केला, पण उपकाराच्या, उध्दाराच्या भाषेचा त्यांनी त्वेषाने सतत धिक्कार केला. पापाचे प्रायश्चित घेण्याच्या भाषेचाही त्यांनी तिरस्कार केला. डॉ. बाबासाहेबांना वैयक्तिक कटु अनुभवाचे जहर क्षणोक्षणी कंठी धारण करावे लागले होते आणि ते जहर केवळ वैयक्तिक नव्हते तर हजारो वर्षे कोटी कोटी स्त्री-पुरूषांनी कंठी बाळगलेल्या-पचविलेल्या विषाचा तो अर्कातला, कटुतम अर्क होता. त्यांची व्यथा केवळ एका व्यक्तिची नव्हती, कोटी कोटी दलित मानवतेची होती. म्हणुनच त्यांचा त्वेष-द्वेष वैयक्तिक नव्हता, तर जन्मजात विषमते विरूध्द होता, पदोपदी-क्षणोक्षणी होणाऱ्या विषमतेच्या विविध विषारी अविष्काराविरूध्द होता. तो धगधगता ज्वालामुखी होता. धर्मांतराच्या चळवळीत हा संघर्षाचा विचार आधिक प्रखर झालेला आहे.

डॉ. बाबासाहेबांच्या उदयामुळे अस्पृष्य वर्गात जी जागृती झाली, स्वाभिमानी-स्वावलंबी आंदोलनाची जी लाट उसळली, त्यामध्ये विशेषतः महार समाज आघाडीला होता. महार समाज आघाडीवर इतर अस्पृष्यांच्या मानाने अधिक जागृत, पुढारलेला, लढाऊ, संघटीत, त्यातच त्यांच्यातून डॉ. आंबेडकरांसारखा लोकोत्तर नेता निर्माण झालेला ! त्यामुळे स्वाभाविकपणेच त्या समाजात एक प्रकारचे परिवर्तन घडुन आले. ती केवळ जागृती नव्हती, तर ते एक उधाण होते, तुफान होते. एकुण समाजाचा कायापालट घडवून आणणारे ते एक क्रांतीकारक परिवर्तनच होते. त्याची व्याप्ती, वेग, तेज यांचा खरे म्हणजे, कोणालाच यथायोग्य अंदाज आला नाही. कोणालाच ते पेलले नाही. तेव्हाच नव्हे, तर आज-आतासुध्दा.

रिपब्लिकन पक्ष म्हणजे एक पुरोगामी डावा पक्ष व्हावा, शुद्र-अतिषुद्र दलित शोषित, श्रमिकांच्या हिताच्या दृष्टीने कणखर लढाऊ, एकजुटीच्या आंदोलनाचे एक प्रभावी हत्यार त्याने बनावे, अशी त्यांची आंतरिक अपेक्षा होती. पण दुर्दैवाने एकाचे दोन, दोनाचे तीन, तीनांची एकजूट करण्यासाठी आणखी नवा एक असे करता करता पक्षाचे तुकडे छिन्न विछिन्न झाले. पुढाऱ्यांगणिक गट, गटागणिक विशिष्ट हितसंबंध आणि त्यासाठी सौदेबाजी असे प्रकार सुरू झाले. कॉंग्रेसच्या उच्चवर्णीय-वर्गीय भ्रष्टाचारी राजवटीशी कसंही करून सोयरिक जमविण्याच्या प्रयत्नात रिपब्लिकन पक्ष डॉ. आंबेडकरांची तेजस्वी शिकवण, स्वाभिमानी परंपरा, स्वतंत्र, लढाऊ अस्तित्व, उज्वल ध्येयवाद सर्वच गमावून बसलेत. लक्षावधी निष्ठावंत लढावू अनुयायांना वाऱ्यावर सोडून लहान-मोठी सर्वच पुढारी मंडळी सर्रास बाजारात बसली. त्याला अपवाद म्हणुन जवळ जवळ एकही पुढारी मागे राहिला नाही. कॉंग्रेसपासुन भाजपा-शिवसेनेपर्यंत कोणाशीही, कशासाठीही, केव्हाही लागेबांधे जमवायला सारेच तयार, असा अनवस्था प्रसंग निर्माण झाला. वर्षानुवर्षे एकीचे प्रयत्न होत राहिले आणि विविध कारणांनी चौफेर विघटन वाढतच चालली आहे. त्यामुळे एकोपा होणे कदापी शक्य नाही, तडजोड तर नाहीच नाही.

सामाजिक समतेचे लढे, आर्थिक मागण्यांचे लढे, वर्गलढे याचा साधा विचार करायलाही कोणाला फारशी फुरसत मिळेनाशी झाली. या सर्वांची लज्जास्पद परिणीती म्हणजे डॉ. बाबासाहेबांच्या रिपब्लिकन पक्षातील व बौध्दजनांतील कार्यकर्ते चार्तुवर्णवादी भाजपात किवा हिंदु फॅसिस्ट शिवसेनेमध्ये सुध्दा खुशाल दिसु लागले आणि त्यांचे मतदार तर कोठेही कोणाच्याही दारात द्वारपाल म्हणुन चाकरी करताहेत. अशी दुरावस्था पक्षाची सत्ताधाऱ्या व उच्चवर्णीयांकडुन आणि त्यातुनही दुर्दैव म्हणजे संधीसाधु पुढाऱ्यांकडुनही होत आहे आणि हे अव्याहत सुरूच राहणार आहे, बेदरकारपणे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा आपले व्यक्तिगत हेतू साध्य करण्यासाठी जाणीवपूर्वक उपयोग करून घेतलेल्या त्याचे अनेक दुष्परिणाम दलिचळवळींना भोगावे लागलेत. तसेच त्यामुळे उद्याच्या समग्र परिवर्तन मागणाऱ्या चळवळीही विकलांग झाल्यातच जमा आहेत. हे नाकारून चालणार नाही, त्याची बोच आज सर्वांना जाणवत आहे. बाबासाहेब केवळ एक तत्वज्ञ नव्हते तर त्यांना भारतात प्रत्यक्ष सामाजिक, राजकिय व सांस्कृतिक चळवळी कराव्या लागल्या आणि त्यासाठी त्यांचा बहुतेक वेळ या चळवळीचे एकमेव नेते या अर्थाने व्यतीत झाला.

उपाव ! समाजाच्या वैशिष्टयांपैकी सर्वात ठळक वैशिष्टय म्हणजे सुशिक्षित वर्गाची पराकोटीला गेलेली स्वार्थीवृत्ती, आपआपसातील मतभेद व एकीमेकांबद्दलची द्वेषभावना. सुशिक्षित लोकांनी निदान आपल्या भावी पिढीसाठी आपल्या समाजाचा मागील इतिहास विसरून चालणार नाही. कारण आपण आपल्या समाजाचा मागील इतिहास विसरलो तर आपण आपल्या समाजाची प्रगतीच करू शकणार नाही. तेव्हा सुशिक्षित बांधवांनी ही जाणीव ठेवावी की, आपल्याला जे वैभव लाभले आहे, ते केवळ डॉ. बाबासाहेबांच्या अथक परिश्रमामुळे... त्यांच्या पुण्याईनेच. एवढा तरी त्यांनी आपल्या मनात सदैव कृतज्ञतेचा भाव ठेवून इतरांना सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक बाबतीत प्रगतीच्या मार्गाने वाटचाल करण्यासाठी मदत करावी. त्यामुळे त्यांचे कल्याण होईल, त्यांची सर्वांगीण प्रगतीही होईल इतकेच नव्हे तर समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय या उच्चतम नैतिक मुल्यांवर आधारलेल्या एका उच्चतम मानवी संस्कृतीचा उदय होईल.

**-प्रभाकर सोमकुवर**
**नागपूर**

# 'व्यावसायिक शेळीपालन प्रशिक्षण' मुक्त विद्यापीठात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**
**नाशिक (प्रतिनिधी)** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कृषि विज्ञान केंद्र येथे दिनांक ०७ ते ११ ऑक्टोबर २०२५ दरम्यान पाच दिवसीय शेळीपालन प्रशिक्षण संपन्न झाले. संख्येने वळावे असे आवाहनही त्यांनी केले.

विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेन्द्रसिंह बिसेन यांनीही प्रशिक्षणार्थींशी संपर्क साधत कार्यक्रमात सहभाग नोंदविला. शेळ्यांसाठी आहार व निवारा व्यवस्थापन, प्रसुतीशास्त्र व नवजात पिलांचे व्यवस्थापन, शेळ्यांचे विविध आजार व त्यांवरील प्रतिबंधात्मक उपाय, विपणन व्यवस्थापन, शेळीपालनातील नोंदींचे महत्व तसेच शेळीपालनासाठी बँक अर्थसहाय्य व कृषी विज्ञान केंद्राच्या यशस्वी शेळीपालकांकडे प्रशिक्षणार्थींचा अभ्यासदौरा, या विविध उपयुक्त विषयांचा या प्रशिक्षणात समावेश करण्यात आला होता.

कार्यक्रमास सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन डॉ. मिलिंद भणगे तसेच प्राचार्य, पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविका महाविद्यालय, आडगाव, नाशिक, डॉ. सी.एम. परदेशी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कृषी विज्ञान केंद्राचे पशुवैद्यकशास्त्र विशेषज्ञ डॉ. श्याम कडूस-पाटील यांनी सदर संपुर्ण प्रशिक्षणाचे समन्वयन व संचालन केले. कृषी विज्ञान केंद्र प्रमुख व वरिष्ठ शास्रज्ञ डॉ. नितीन ठोके यांनी कृषी विज्ञान केंद्राच्या यशस्वी शेळीपालकांची व्यवसायपद्धती विषद केली. शैक्षणिक समन्वयक अमोल पुंड यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशेष प्रयत्न केले. केंद्राचे कृषी अभियंता राजाराम पाटील, उद्यानविद्या तज्ञ हेमराज राजपूत, कृषीविद्यावेत्ता डॉ. प्रकाश कदम, गृहविज्ञान तज्ञ श्रीमती अर्चना देशमुख, माती-पाणी तज्ञ मंगेश व्यवहारे, संगणक आज्ञावलीकार हर्षल काळे तसेच ऋषिकेश पवार उपस्थित होते.




त्यात ३७ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले. या प्रशिक्षणाच्या समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू संजीव सोनवणे होते.

यावेलो बोलतांना कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की शेतीतील बदलती परिस्थिती, शेतमालाच्या भावातील चढ-उतार आणि बेभरवाशी उत्पन्न यामुळे शेतीसंलग्न व्यवसाय म्हणून 'शेळीपालन' व्यवसायाच्या उदयास येवून वृद्धींगत होत आहे. कमीत-कमी खर्चामध्ये शाश्वत उत्पन्न देणाऱ्या या व्यवसायाकडे शेतकरी व तरुणांनी मोठ्या संख्येने वळावे असे आवाहनही त्यांनी केले.

# अनुसूचित जातीच्या वर्गीकरणाला बसपा चा तीव्र विरोध !

**आत्ताच एक्सप्रेस**
**पुणे (प्रतिनिधी)** राज्यात अनुसूचित जातींमध्ये (एससी) उपवर्गीकरणाचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात असून लवकरच त्याची अंमलबजावणी केली जाईल, अशी माहिती सरकारने दिली आहे. मात्र वर्गीकरणाच्या प्रक्रियेवर बहुजन समाज पक्षाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. वर्गीकरणामुळे सामाजिक एकतेला तडे जाऊ शकतात, अशी चिंता पक्षाचे प्रदेश महासचिव,पश्चिम महाराष्ट्र झोन मुख्य प्रभारी डॉ.हुलगेश चलवादी यांनी सोमवारी व्यक्त केली.सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात एससी गटातील प्रगत समाजांमुळे मागे पडलेल्यांना न्याय मिळावा यासाठी उपवर्गीकरणाचा विचार करता येईल, असा निर्वाळा दिला होता. मात्र, या निर्णयाचा संदर्भ घेऊन संपूर्ण एससी गटाचे विभाजन करणे, हे केवळ तात्कालिक राजकीय फायदे साधण्यासाठी होत असल्याचा दावा डॉ.चलवादी यांनी केला. एससी प्रर्वागील अनेक जाती शैक्षणिक दृष्ट्या पुढारल्या असल्या तरी आर्थिक समानतेच्या पातळीवर त्यांना आजही बराच संघर्ष करावा लागत आहे. अशात 'क्रिमी लेअर' संदर्भात विचार करणे घटनादत्त अधिकारांचे उल्लंघन ठरेल, असे डॉ.चलवादी म्हणाले.अनुसूचित जातीला एकसंध लढ्याचा इतिहास आहे. शिक्षण, नोकरी, राजकारण या सर्वच क्षेत्रात आरक्षणाच्या माध्यमातून मिळवलेले हक्क ही सर्वच घटकांची सामूहिक कमाई आहे. अशा वेळी कोण पुढे गेलं, कोण मागे राहिलं या निकषांवर आरक्षणाचे विभाजन एक प्रकारचा द्वेषभावना निर्माण करणारा प्रयोग ठरू शकतो, अशी चिंता डॉ.चलवादी यांनी व्यक्त केली.ज्या घटकांना आरक्षणाचा अपेक्षित लाभ मिळाला नाही, त्यांच्यासाठी विशेष उपाययोजना- जसे की शैक्षणिक सवलती, विशेष शिष्यवृत्ती योजना, कौशल्य प्रशिक्षण, उद्योजकता प्रोत्साहन राबवता येऊ शकतात. त्यासाठी संपूर्ण वर्गाचे विभाजन योग्य नाही.विशेष आरक्षण योजना वंचित घटकांसाठी ठरवून तेवढ्यापुरती मर्यादित सवलत दिली जाऊ शकते, ज्यामुळे सामाजिक सलोखा बिघडणार नाही आणि खरंच मागे असलेल्या घटकांना न्याय मिळू शकतो, असे मत डॉ. चलवादी यांनी व्यक्त केले.समितीचे कार्य अंतिम टप्प्यात असले तरी या प्रक्रियेतील पारदर्शकता, सामाजिक संवाद आणि जनसामान्यांचा सहभाग याकडे दुर्लक्ष झाले आहे. सर्वच समाजघटकांच्या भविष्यावर परिणाम करणाऱ्या निर्णयांमध्ये केवळ निवडक मतप्रवाहाच्या आधारे निर्णय घेणे योग्य ठरत नाही.आरक्षणासारख्या संवेदनशील विषयावर निर्णय घेण्याआधी, सर्व समाजघटकांचा विश्वास संपादन करून, सार्वजनिक चर्चेच्या माध्यमातून सामूहिक सहमती निर्माण केली पाहिजे. अन्यथा, हा निर्णय सामाजिक संघर्षाचे नवे पर्व सुरू करेल, अशी भीती यानिमित्ताने डॉ.चलवादी यांनी व्यक्त केली.



# फुलंब्री नगर पंचायतची निवडणूक लागली , हवसे नवसे मातब्बर लागले कामाला

## सोशल मीडिया वर रंगत आहे भावी नगरसेवकची पोस्ट
## नगराध्यक्ष पदाची जागा सर्वसाधारण असल्याने तिरंगी लढत असण्याची शक्यता

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री / प्रतिनिधी/** नगर पंचायतीचे नगराध्यक्षपद यंदा सर्वसाधारण प्रवर्गासाठी खुले झाले असून शहरात नव्या राजकीय घडामोडींना वेग आला आहे. आरक्षण जाहीर होताच विविध पक्षांतील संभाव्य उमेदवारांच्या चर्चांना उधाण आले आहे. 'सत्तेचा दरवाजा आता सर्वांसाठी खुला' अशा भावना व्यक्त करत राजकीय वर्तुळात हालचाली सुरू झाल्या आहेत.राज्य शासनाने नुकत्याच जाहीर केलेल्या नगर पंचायत आरक्षण तक्त्यानुसार फुलंब्री नगरपंचायतीचे नगराध्यक्षपद कोणत्याही प्रवर्गासाठी आरक्षित न ठेवता सर्वसाधारण केले आहे. त्यामुळे सर्व समाजघटकांतील उमेदवारांना या पदासाठी स्पर्धेत उतरण्याची समान संधी उपलब्ध झाली आहे.फुलंब्री शहराला नगरपंचायतीचा दर्जा मिळाल्यानंतर ही दुसरी निवडणूक ठरणार आहे. पहिली निवडणूक १३ डिसेंबर २०१७ रोजी झाली होती. त्या वेळी भाजपाचे सुहास शिरसाट यांनी फुलंब्री शहर विकास आघाडीचे राजेंद्र ठोंबरे यांचा अवघ्या १८९ मतांनी पराभव करून पहिल्यांदाच नगराध्यक्षपदाची गादी मिळवली होती. त्या वेळी हे पद ' नागरिकाचे मागास प्रवर्ग साठी आरक्षित होते.

**राजकीय हालचालींना वेग**

भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि शिवसेना, एम आय एम, फुलंब्री परिवर्तन आघाडी, या पक्षांमध्ये संभाव्य उमेदवारांची नावे फिरू लागली आहेत. काही सामाजिक कार्यकर्ते आणि स्वतंत्र गटही या पदावर दावा सांगण्यासाठी सज्ज होत आहेत. राजकीय वातावरणात नव्या समीकरणांची निर्मिती, संभाव्य आघाड्यांवर चर्चा सुरू झाली असून पुढील काही दिवसांत चित्र अधिक स्पष्ट होईल, अशी शक्यता आहे.

**नगराध्यक्ष पदासाठी चर्चेतील नाव**

सुहास शिरसाठ, महायुती ,
राजेंद्र ठोंबरे , महाविकास आघाडी,
नफीस पटेल, फुलंब्री परिवर्तन आघाडी
मुदस्सर पटेल, भारतीय काँग्रेस पक्ष
रऊफ कुरैशी , शिवसेना शिंदे गट,
नितीन देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजीत पवार गट
या इतरांची नावे आहेत चर्चेत.

**नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या**

शहरातील रस्त्यांची दुरवस्था, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, तसेच अतिक्रमण यांसारख्या मूलभूत समस्या नागरिकांना सतावत आहेत. त्यामुळे या निवडणुकीत 'विकास' हा मुद्दा केंद्रस्थानी राहणार आहे. आम्हाला पक्ष नाही, काम करणारा माणूस हवा. जो फुलंब्रीचा चेहरा बदलवेल, त्यालाच नगराध्यक्ष बनवू, असे मत स्थानिक नागरिक व्यक्त करीत आहेत.

**आरक्षण सोडतीने इच्छुकांचे कंबरडे मोडले**

नगर पंचायत निवडणूक संदर्भात झालेल्या आरक्षण सोडतीने शहरातील बर्याच हवसे नवसे व भावी नगरसेवकांचे निवडणुकीत उभे राहण्या अगोदर स्वप्नात पडल्याने कबंरडे मोडले आहे.याचाच काही फायदा घेत स्वतःला मातब्बर समजणारे काही राजकीय बगळे या वार्डातुन त्या वार्डात तोंड घालत असल्याचे दिसुन येत आहे परंतु आयात करण्यात येणाऱ्या अशा उमेदवारांना स्थानिक मतदार आपल्या मता चे दान करणार का? हा प्रश्न निर्माण झालेला आहे.

**फुलंब्री परिवर्तन आघाडी स्वतंत्र पॅनल उभा करणार**

काही दिवसापूर्वीच फुलंब्री नगरपंचायत वॉर्ड आरक्षण सोडतीचा कार्यक्रम पार पडला ज्यात फुलंब्री शहरातील मुस्लिम बहुल वॉर्ड सहित पानेवाडी येथील वार्ड आरक्षित झाल्यामुळे मुस्लिम भावी नगरसेवकांचे स्वप्न भंग झाले आहे. शहरातील मतदार यादीत सुध्दा मोठा फेर बदल झाल्यामुळे अनेक मतदारांचे वास्तव्य एका ठिकाणी तर नांव दुसऱ्या भागात गेले आहे, म्हणून असे मतदार ज्या ते त्या ठिकाणी आणण्यासाठी इच्छुकांची उठाठेव सुरु आहे, नगर पंचायत कडुन प्रसिद्ध झालेल्या प्रारुप मतदार यादी संदर्भात नांव ट्रान्सफर करण्यासाठी आता पर्यंत हजारोच्या संख्येने अर्ज दाखल करण्यात आले आहे. ह्या सगळ्या प्रकाराकडे फुलंब्री परिवर्तन आघाडी चे लक्ष लागून आहे. लवकरच शहराचे समिकरण लक्षात घेता फुलंब्री करांसाठी तिसरा पर्याय म्हणून स्वतंत्र पॅनलच्या माध्यमातून नगराध्यक्ष पदा सह सर्व १७ च्या १७ वार्डात उमेदवार लढविणार असल्याचे फुलंब्री परिवर्तन आघाडी च्या संयोजक नफीस अब्दुल्ला पटेल यांनी दैनिक आत्ताच एक्स्प्रेसला प्रतिक्रिया दिली आहे आहे.

## संक्षिप्त

### चिंचोली लिंबाजी येथील सागर श्रीखंडे यांचे अपघातात निधन

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड /प्रतिनिधी/**कन्नड तालुक्यातील चिंचोली येथील मित्राला सोड्याला भुसावळला जाताना कार उलटून झालेल्या अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला असून तीन तरुण जखमी झाल्याची घटना घडली आहे.हा अपघात जामनेर-भुसावळ मार्गावर रात्री दोन वाजेच्या सुमारास घडला.सागर आबाराव श्रीखंडे (रा.चिंचोली लिंबाजी ता.कन्नड ) असे मयत तरुणाचे नाव आहे.गणेश बाळाराम गोरे,सुनील बाळाराम गोरे,दीपक आढाव (सर्व रा.चिंचोली लिंबाजी)असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे.



चिंचोली लिंबाजी येथील गणेश बाळाराम गोरे हा तरुण सैन्यदलात कार्यरत आहे. सुटी संपल्याने कर्तव्यावर जाण्यासाठी रविवारी रात्री बारा वाजेच्या सुमारास गणेश गोरे,त्यांचा भाऊ सुनील ,मित्र सागर श्रीखंडे,दीपक आढाव हे चौघे जण एम एच २० इ जे ८१९५ कारणे चिंचोली लिंबाजी येथून भुसावळला जाण्यासाठी निघाले होते.मात्र जामनेर ते भुसावळ मार्गावर कारचा अपघात झाला. कार पलटी झाली.हा अपघात इतका भीषण होता की कारणे तीन चार पलट्या खाल्ल्या. स्थानिकांनी अपघाताची माहिती पोलिसांना दिली.अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन चौघांना भुसावळ येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.मात्र रुग्णालयात येण्या पूर्वीच सागर श्रीखंडे याचा मृत्यू झाला होता.अपघातातील जखमी गणेश ,सुनील,दीपक यांच्यावर भुसावळ येथील रुग्णालयात उपचार सुरू आहे.सोमवारी दुपारी शवविच्छेदन केल्यानंतर सायंकाळी पाच वाजता चिंचोली लिंबाजी येथील स्मशानभूमीत सागर याच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.त्याच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन भाऊ, भावजय असा परिवार आहे.

# सोयगाव तालुक्यात पंचायत समिती गण व गटांचे आरक्षण जाहीर

**सोयगाव तालुक्यातील गट व गण निहाय आरक्षण**

| जि.प. गट | आरक्षण |
|---|---|
| १.आमखेडा | ओबीसी महिला |
| २.गोंदेगाव | अनुसुचित जमाती महिला |
| ३.फर्दापूर | सर्वसाधारण महिला |
| ४.पंचायत समिती सदस्य आरक्षण | |
| ५.आमखेडा | अनुसूचित जाती महिला |
| ६.निंबायती | ना मा प्र (सर्वसाधारण ) |
| ७.फर्दापूर | खुला (सर्वसाधारण ) |
| ८.सावदबारा | खुला ( सर्वसाधारण) |
| ९.गोंदेगाव | अनुसूचित जमाती महिला |
| १०.बनोटी | ना.मा.प्र (महिला) |




**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव / प्रतिनिधी/** सोयगाव तालुक्यातील सहा गण व तीन गटांचे आरक्षण सोमवारी जाहीर झाले यामध्ये सोयगाव पंचायत समितीच्या सभागृहात सहा गणांसाठी आरक्षण काढण्यात आले यावेळी अध्यासी अधिकारी प्रवीण फुलारी,तहसीलदार मनीषा मेने, गटविकास अधिकारी शिवाजी यमूलवाड,नायब तहसीलदार राहुल पत्रिके आदींनी आरक्षित गण वगळता इतर गणांसाठी चिठ्ठी टाकून आरक्षण काढले यामध्ये आमखेडा(अनुसूचित जाती महिला)व गोंदेगाव गण (अनुसूचित जमाती महिला) साठी राखीव झाल्याने या दोन्ही गणात प्रभाव असलेल्या भाजप व उद्धव ठाकरे गटाची गोची झाली आहे.

त्यामुळे या दोन्हीही गणातील इच्छुक आता सुरक्षित गण शोधण्यासाठी तयारीला लागले आहेत फरदापुर गट आणि गण व सावळदबारा गण हे सर्वसाधारण साठी राखीव झाले आहे आमखेडा गट ओ बी सी महिला साठी राखीव झाल्याने या गटात भाजप कडून तत्कालीन जिल्हा परिषद सदस्या पुष्पाबाई काळे या रिंगणात राहण्याची शक्यता आहे मात्र हा गण अनुसूचित जाती महिला साठी राखीव झाला आहे गोंदेगाव गट अनुसूचित महिला व गण ही अनुसूचित महिलेला राखीव झाल्याने या गटात सर्वच राजकिय पक्षांना नवखा चेहरे शोधावे लागणार आहे त्यामुळे या गट आणि गणात राजकिय चुरस राहिली नसल्याची चर्चा आहे.

बनोटी गण हा सर्वसाधारण महिला राखीव झाला आहे. निंबायती गण ओ बी सी पुरुष साठी सुटल्याने हा गणात मात्र मोठा कस लागणार आहे या गणात भाजपाचा प्रभाव असून शिंदे सेना इतर गणातून उमेदवार देऊ शकतात.

सोयगाव तालुक्यात तीन गट आहे यामध्ये सर्वात चुरशीची लढत होणारा गोंदेगाव गट अनुसुचित जमाती महिला राखीव झाला आहे त्यामुळे या गटातील चुरस राहिली नाहीआमखेडा गट ओ बी सी महिला राखीव झाला.

# जड वाहतूक बंद करण्यासाठी राष्ट्रवादीतर्फे रास्ता रोको

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी/** अहिल्यानगर मनमाड रस्ता दुरूस्तीच्या कामामुळे मागील महिनाभरापासून गंगापूर शहरातून वळवण्यात आलेल्या जड वाहनांच्या वाहतुकीमुळे शहरातील दोन जणांना जीव गमवावा लागला असून दररोज होत असलेल्या वाहतुक कोंडीमुळे नागरिक त्रस्त झाल्याने राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे दि. १३ ऑक्टोंबर रोजी शहरात मुख्य ररस्त्यावर अर्धातास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. गंगापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये झालेल्या या आंदोलनात राष्ट्रवादीचे तालुकाअध्यक्ष व माजी नगराध्यक्ष संजय जाधव, शहराध्यक्ष मुजीब समाज, तुकाराम सटाले, सुरेश नेमाडे, सोपान देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आंदोलकांनी प्रशासनाविरोधात घोषणा देउन जड वाहतूक तत्काळ बंद करण्याची मागणी केली. यावेळी बोलताना संजय जाधव यांनी सांगितले की, अहिल्यानगर ते मनमाड या रस्त्याच्या दुरूस्तीच्या कामासाठी तेथील प्रशासनाने २१ सप्टेंबरपर्यंत ही वाहतूक वळवण्याचे लेखी पत्र




**अर्धा तास वाहतूक ठप्प वाहनांच्या दुतर्फा रांगा**

दिले होते. परंतु मुदत संपून वीस दिवसांपेक्षा अधिक कालावधी होउनही जड वाहनांची वाहतूक सुरूच असल्याने नागरिक त्रस्त झाले आहे. दरम्यानच्या काळात शहरातील जड वाहनांमुळे दोन जणांना जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे संबंधित विभागाने शहरातील जड वाहनांची वाहतूक तत्काळ थांबवून पर्यायी व्यवस्था करावी तोपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा दिला. याप्रसंगी तहसील प्रशासन व पोलिस निरिक्षकांतर्फे आंदोलकांच्या भावना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत अहिल्यानगर येथील संबंधित विभागाला कळवून तातडीने जड वाहतूक बंद करण्याबाबत कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. यावेळी पोलिस निरिक्षक कुमारसिंग राठोड, महसूलतर्फे गणेश लोणे, गुप्त वार्ता विभागाचे मनोज नवले, मा. नगरसेवक योगेश पाटील, दिनेश गायकवाड,मा.मोहसीन चाऊस,मुकुंद जोशी,सोपान देशमुख ,तुकाराम साटले ,मुजीब समाज ,अनिस कुरेशी,विशाल दारुटे,बाबासाहेब लगड गुड्डू चाऊस कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्ञानराज माऊली महिला भजनी मंडळला भजन स्पर्धेत प्रथम पारितोषिक

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ आयोजित भजन स्पर्धेत छत्रपती संभाजी नगर विभागातून ललित कला भवन उस्मानपुरा यांच्या वतीने ज्ञानराज माऊली महिला भजनी मंडळाने भजन स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला व या स्पर्धेमध्ये ताल संचलनाचे प्रथम पारितोषिक संघाला श्री कृष्णाजी घायट पाटील (गुरुजी) यांचे विशेष मार्गदर्शन लाभलेले आहे. या संघातील सहभागी कलावंत खालील प्रमाणे आहेत.

संघ प्रमुख व हार्मोनियम वादक - सौ. सविता घायट,मुख्य गायक/ गायिका- सौ. रुक्मिणी कचकुरे,तबलावादक - कैवल्य घायट सहभागी गुनिजन - सौ. सरला भिंगारे सौ. अंजना सोनवणे



व भजनी मंडळाचे सांघिक प्रथम पारितोषिक मिळवून या संघाची महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ आयोजित नागपूर येथील राज्यस्तरीय भजन स्पर्धेसाठी निवड झालेली आहे तसेच नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने हरसिद्धी माता मंडळ आयोजित जिल्हास्तरीय खुल्या भजन स्पर्धेत या भजनी संघाने सर्वोत्कृष्ट भजनी मंडळाचे प्रथम पारितोषिक पटकविले आहेत म्हणून या भजनी संघाचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक केले जात आहे तसेच हनुमान मंदिर ट्रस्ट यांचे सिडको संभाजी कॉलनी छत्रपती संभाजीनगर च्या वतीने विशेष अभिनंदन करण्यात आले या सौ. चंद्रकला रोहे सौ. पुष्पा देवडे सौ. मंदा चिकणे, सौ. कांता चव्हाण सौ. पुष्पा लहाने सौ. निलावती क्षीरसागर सौ. सुनीता पडूळ इ. या संघाने राम कृष्ण हरी भजन ठाई धुमाळी मध्ये, हरी प्राप्तीसी उपाय ठाई धुमाळी मध्ये,धन्य आजी दिन हे भजन भजनी ठेक्यात तसेच देहुडा चरणी वाजविती वेणू ही गवळण व इवलेसे रोप लाविले द्वारी हे भैरवी रागातील भजन सादर करून सर्व श्रोत्यांची दाद मिळवून कौतुकास पात्र ठरले. सर्वांनी या भजनी संघास पुढील राज्यस्तरीय भजन स्पर्धेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## जवखेडा बु येथे छंत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारणार

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड /प्रतिनिधी/**कन्नड तालुक्यातील जवखेडा बु. या शिवप्रेमी गावाची दीर्घकाळची इच्छा अखेर पूर्ण होत आहे. शिवप्रतिष्ठान उत्सव समितीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यास जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, या निर्णयानंतर संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.जवखेडा बु. हे गाव तालुक्यातील शिवभक्ती आणि शिवसंस्कृतीसाठी प्रसिद्ध असून, येथे दरवर्षी तालुक्यातील सर्वात मोठा शिवजयंती



उत्सव अत्यंत दिमाखात साजरा केला जातो. या दिवशी गावातील सर्व नागरिक दिवाळीसारखा सण साजरा करत, नवीन कपडे परिधान करून महाराजांचा जयघोष करतात.गावात छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा असावा, ही इच्छा गेल्या अनेक वर्षांपासून शिवप्रतिष्ठान उत्सव समिती आणि गावकऱ्यांची होती. समितीच्या पदाधिकारी व सदस्यांनी मिळून प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. अखेर जिल्हाधिकाऱ्यांकडून अधिकृत मंजुरी पत्र मिळाल्याने ग्रामस्थांचा आनंद गगनात मावेनासा झाला आहे.आता शिवभक्तांच्या उत्सुकतेचा विषय म्हणजे या पुतळ्याचे लोकार्पण सोहळा. लवकरच छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी उभारला जाणार असून, या ऐतिहासिक क्षणाची सर्व गावकऱ्यांना आतुरता लागली आहे.




# दिव्यांग बांधवांच्या विविध कल्याणकारी योजनांची पारदर्शकपणे अंमलबजावणीची माघनी

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण /प्रतिनिधी/** पैठण तालुक्यातील दिव्यांग बांधवांच्या विविध कल्याणकारी योजनांची शासनाकडून तातडीने व पारदर्शकपणे अंमलबजावणी करणे बाबत.पैठण तालुक्यातील दिव्यांग बांधवांना विविध योजना असताना तहशिल कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, नगरपालिका, ग्रामपंचायत कार्यालयात सतत हेलपाटे मारण्यास भाग पाडतात. एवढेच नाही तर काही कार्यालये चिरीमिरी घेतल्याशिवाय कागदपत्रे पाहतच नाही.म्हणून प्रतिष्ठाण दिव्यांग संघटनेच्या पदाधिकारी हे उपोषण करून आत्मक्लेश करण्यासाठी आज

**प्रतिष्ठाण दिव्यांग संघटनच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन**

दि. १३/१०/२०२५ दिव्यांग संबंधित कार्यालयाना निवेदन दिले. पंधरा दिवसांत दिव्यांग बांधवांना न्याय न दिल्यास ०१/११/२०२५ रोजी विविध मार्गांचा अवलंब करून शासनाला लोकशाही मार्गाने दिव्यांग बांधवांच्या हक्काच्या योजना राबविण्यासाठी लढा चालू ठेवण्यात येईल. असे प्रतिष्ठान दिव्यांग संघटने कडून या वेळी आत्ताच एक्सप्रेस शी बोलतांनी सांगण्यात आले आहे.

यावेळी प्रतिष्ठाण दिव्यांग संघटनचे तालुका अध्यक्ष श्री बाबासाहेब पठाडे, धम्मरत्न अंधोरीकर, नंदु चाटुपळे, विष्णू सोनार, राजेंद्र मिसाळ, किशन बढे, हबीबभाई, शिवनाथ चोरमले , दत्तात्रेय झिरपे, अनिल गरोटे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# संक्षिप्त

## खुलताबाद पंचायत समितीच्या सहा गणांचे आरक्षण जाहीर

**होताच राजकीय घडामोडीला वेग आले आहे**




**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद/प्रतिनिधी**/खुलताबाद पंचायत समिती गणांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोमवारी दिनांक १३ ऑक्टोबर रोजी आरक्षण सोडत निश्चित करण्यात आले आहे.खुलताबाद पंचायत समितीच्या सभागृहात बारा वाजेच्या सुमारास उपजिल्हा अधिकारी संगीता सानप,यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार स्वरूप कंकाळ' गटविकास अधिकारी प्रकाश नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत पंचायत समितीचे सभागृहात तालुक्यातील सहा गणांचे आरक्षण सोडत यशस्वी रित्या पार पडले.या प्रसंगी सर्व पक्षीय पदाधिकारी, इच्छुक उमेदवार व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आरक्षणानुसार गणांची यादी पुढीलप्रमाणे ठरली: बाजार सावंगी - नागरिकांचा मागास प्रवर्ग (सर्वसाधारण), टाकळी राजेराय - सर्वसाधारण, ताजनापुर, गदाना आणि गल्लेबोरगाव - महिला (सर्वसाधारण), वेरुळ - अनुसूचित जाती (सर्वसाधारण) या आरक्षण सोडत लकी ड्रॉचा थरार लहान शाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते चिठ्ठ्या काढून रंगतदार पद्धतीने जाहीर करण्यात आला.सर्व गणांचे आरक्षण नियमांनुसार पारदर्शक पद्धतीने ठरवले गेले, ज्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. उपस्थित कार्यकर्त्यांनी प्रक्रियेचे स्वागत केले आणि यासंदर्भातील माहिती स्पष्ट करण्यात आली.

## शिवनी रोड ख्वाजा नगर बीड या रहिवासी महिला ने उठवला आवाज

**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड/ प्रतिनिधी**/१२ वर्षा पासुन नगर पालिका का चे नळ कनेक्शन कचरा घंटागाडी शिवानी रोड ते खाजा नगर दुरावस्था असल्यामुळे सर्व महिला भगिनींनी आवाज उठवला सामाजिक कार्यकर्त्या सारिका पाटील टायगर ग्रुप आरती शिंदे व रहिवाशी मुमताज शेख रुकसाना शेख तसलीम पठाण या सर्व महिला भगिनींनी



नगरपालिकेला २०२४ मध्ये निवेदन दिले होते तरीही त्यांना नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी तांत्रिक अडचणी सांगून कुठल्याही योजनेचा लाभ न देता नुसते आश्वासन दिले व त्या एरियातील नगर-सेवक फक्त मतदानाच्या वेळेसच येतात असं इथल्या महिला भगिनींचे म्हणणे आहे की आमच्या मुलांना शाळेत जाण्यासाठी रस्ता नाहीये पिण्यासाठी पाणी नाहीये व रोडवरील संसर्ग रोग होण्यासाठी जो कचरा नगरपालिकेच्या घंटागाडी च्या गैरसोयेमुळे तिथल्या रहिवाशांना आजाराचे प्रमाण वाढले आहे यामुळे सर्व महिला भगिनींनी आवाज उठून नगरपालिकेला आक्रमकता दाखवली आहे व निवेदन देऊनही न्याय मिळत नसेल तर आक्रमक आंदोलन करण्यात येईल असे इशाराही दिला व त्यांना पाठिंबा म्हणून सामाजिक कार्यकर्त्या सारिका पाटील यांनी जाहीर पाठिंबा आश्वासन दिले.

# जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणूक-२०२५

# जालना जिल्हा परिषदेसाठी तालुकानिहाय गटांसाठी आरक्षण निश्चित

## -जिल्हा परिषद मतदारसंघाच्या आरक्षणासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात सोडत संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ जालना जिल्हा परिषदेसाठी गटनिहाय आरक्षणाची सोडत जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात काढण्यात आली. जिल्हा परिषदेचे तालुकानिहाय






छाया- अनिल व्यवहारे



गटामध्ये आरक्षण निश्चित करण्यात आले. यामध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग १५, सर्वसाधारण ३३, अनुसूचित जाती ८, अनुसूचित जमाती १ असे गटनिहाय आरक्षण निश्चित झाले. तसेच पंचायत समितीच्या सभापतीपदासाठी देखील आरक्षण सोडत पार पडली.

यावेळी अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) नम्रता चाटे, नायब तहसिलदार तुषार निकम यांच्यासह जिल्ह्यातील ग्रामस्थांची उपस्थिती होती. जिल्हा परिषद मतदारसंघासाठी झालेल्या गट निहाय आरक्षण खालील प्रमाणे आहेत.

**भोकरदन तालुक्यातील गट**

वालसावंगी - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), पारध बु. - नागरिकांचा मागास प्रवर्ग, जळगाव सपकाळ - अनुसूचित जमाती (महिला), आन्वा - सर्वसाधारण (महिला), वालसा वडळा - सर्वसाधारण, आव्हाना - नागरिकांचा मागास प्रवर्ग, सोयगाव देवी - सर्वसाधारण (महिला), नळणी बू.- सर्वसाधारण, हसनाबाद-नागरिकांचा मागास प्रवर्ग, चांदई ठोंबरी - सर्वसाधरण (महिला), राजूर - अनुसूचित जाती (महिला).

**जाफ्राबाद तालुक्यातील गट**

वरूड बू.- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), माहोरा - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), जवखेडा ठेंग - अनुसूचित जाती (महिला), सिपोरा अंभोरा - अनुसूचित जाती (महिला), टेंभूर्णी - नागरिकांचा मागास प्रवर्ग, अकोला देव - नागरिकांचा मागास प्रवर्ग.

**बदनापूर तालुक्यातील गट**

दाभाडी - सर्वसाधारण (महिला), बावणे पांगरी - अनुसूचित जाती, गेवराई बाजार - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), शेलगाव - अनुसूचित जाती, रोषनगाव - सर्वसाधारण (महिला).

**जालना तालुक्यातील गट**

वाघ्रुळ जहाँगीर - अनुसूचित जाती, पीरकल्याण- सर्वसाधारण (महिला), मोजपूरी- सर्वसाधारण, शेवली - अनुसूचित जाती, नेर - सर्वसाधारण, रामनगर - सर्वसाधारण (महिला), देवमुर्ती - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), रेवगाव - अनुसूचित जाती (महिला), भाटेपूरी - सर्वसाधारण.

**मंठा तालुक्यातील गट**

तळणी- सर्वसाधारण, खाराड सावंगी - सर्वसाधारण, जयपूर - सर्वसाधारण, हेलस - सर्वसाधारण, पांगरी गोसावी - सर्वसाधारण (महिला), केंधळी - नागरिकांचा मागास प्रवर्ग.

**परतूर तालुक्यातील गट**

वाटूर - सर्वसाधारण, सातोना खुर्द - सर्वसाधारण (महिला), पाटोदा माव - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), आष्टी - सर्वसाधारण (महिला), कोकाटे हदगाव - सर्वसाधारण (महिला).

**घनसावंगी तालुक्यातील गट**

राणीउंचेगाव - सर्वसाधारण, रांजणी - सर्वसाधारण, गुरुपिंपरी - सर्वसाधारण, मच्छिंद्रनाथ चिंचोली - सर्वसाधारण, कुंभारपिंपळगाव - सर्वसाधारण (महिला), अंतरवाली टेंभी - सर्वसाधारण (महिला), राजाटाकळी - सर्वसाधारण (महिला)

**अंबड तालुक्यातील गट**

रोहिलागड - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), पारनेर - सर्वसाधारण (महिला), जामखेड - नागरिकांचा मागास प्रवर्ग, ताडहादगाव - सर्वसाधारण, धाकलगाव - सर्वसाधारण (महिला), साष्टपिंपळगाव - सर्वसाधारण, गोंदी - सर्वसाधारण, शहागड - सर्वसाधारण.

**जालना जिल्ह्यातील ८ पंचायत समितीच्या सभापती पदासाठी आरक्षण सोडत पुढीलप्रमाणे आहे.**

भोकरदन - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), जाफ्राबाद - अनुसुचित जाती, जालना - नागरिकांचा मागास प्रवर्ग, मंठा - सर्वसाधारण, बदनापूर - सर्वसाधारण, घनसांवगी - सर्वसाधारण (महिला), परतूर - सर्वसाधारण (महिला), अंबड - सर्वसाधारण (महिला) याप्रमाणे राहील.

# पोलीस पाटील पदभरती-२०२५ लेखी परिक्षेचा १४ ऑक्टोबरला निकाल

## लेखी परीक्षेत उत्तीर्ण उमेदवारांच्या १५ ऑक्टोबर होणार मुलाखती

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ जालना जिल्ह्यातील जालना/बदनापूर उपविभागातील एकूण १८५ पोलीस पाटील पदांसाठी घेण्यात आलेली लेखी परीक्षा दि. १२ ऑक्टोबर २०२५ रोजी यशस्वीरित्या संपन्न झाली आहे. या लेखी परिक्षेचा निकाल दि. १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी jalnapp.recruitonline.ळप या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे. लेखी परीक्षेत उत्तीर्ण ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दि. १५ ऑक्टोबर, २०२५ पासून सुरू होणार आहेत. मुलाखतीचे सविस्तर वेळापत्रक, उमेदवारानुसार वेळ आणि स्थळ लवकरच अधिकृत संकेतस्थळ recruitonline.in वर प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

या मुलाखतीसाठी उमेदवारांना अत्यंत महत्वाच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. यामध्ये मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांनी खालील नमूद सर्वमूळ कागदपत्रे आणि त्यांच्या दोन (२) साक्षांकित (Attested) प्रती तसेच नजीकच्या काळातील दोन (२) पासपोर्ट आकाराचे फोटोसोबत घेवून वेळेवर मुलाखतीस उपस्थित राहावे. तसेच १० वी, (आवश्यक) १२ वी (असल्यास) आणि पदवी परीक्षा (असल्यास) उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र व गुणपत्रक, तहसीलदार यांनी निर्गमित केलेले वय व अधिवास प्रमाणपत्र (-सश रपव ऊेाळलळश्रश उशीींळषळलरींश), जातीचे प्रमाणपत्र (Caste Certificate) व जात वैधता प्रमाणपत्र (उरीींश तरश्रळवळीूं उशीींळषळलरींश) (असल्यांस), नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate) (लागू असलेल्या मागास प्रवर्गास), लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र (-ffidavit of Small Family), आधार कार्ड / मतदार ओळखपत्र (-रवहरर उरीव / तेींशी खऊ), उमेदवाराचे परीक्षा प्रवेशपत्र (Hall Ticket), नमूना 'फ'चे प्रमाणपत्र (लग्नानंतर नावात बदल असल्यास), जाहिरातीत नमूद केलेले इतर सर्व आवश्यक मूळ कागदपत्रासह मुलाखतीस उपस्थित राहावे. वरीलप्रमाणे नमूद आवश्यक मूळ कागदपत्रापैकी कोणतेही एक कागदपत्र सादर न केल्यास, उमेदवारास मुलाखतीसाठी तात्काळ अपात्र ठरविण्यात येईल. उमेदवारांची कोणतीही विनंती स्वीकारली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

उमेदवारांनी वेळोवेळी recruitonline.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन माहिती घ्यावी. कोणतेही वैयक्तिक पत्र अथवा लेखी पत्र व्यवहार उमेदवारांना केला जाणार नाही. मुलाखत प्रक्रिया हीअतिशय पारदर्शक आणि पूर्णपणे निष्पक्षपद्धतीने घेतली जाणार आहे. यामुळे उमेदवारांनी कोणत्याहीअफवांवर विश्वास ठेवू नये. निवड प्रक्रियेत कोणीही शिफारस, हस्तक्षेप किंवा दबाव टाकण्याचा प्रयत्न करू नये. कोणत्याही एजंट, दलाल किंवा मध्यस्थांना संपर्क करू नये. असे कृत्य करतांना कोणीही व्यक्ती (उमेदवार अथवा दलाल) निर्दशनास आल्यास, संबंधितांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येईल व संबंधीताची उमेदवारी तात्काळ रद्द करण्यात येईल. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस पोलीस पाटील निवड समिती कोणत्याही परिस्थितीत निवड प्रक्रियेमध्ये सहभागी होवून देणार नाही याची सर्व संबंधीत उमेदवरांनी नोंद घ्यावी असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी जालना यांनी केले आहे.

# अंबड- घनसावंगी राज्यमार्ग क्र. ६१: रस्त्याची अवस्था बिकट, सिलकोट न झाल्याने खड्डे वाढले

**आत्ताच एक्सप्रेस**

**घनसावंगी प्रतिनिधी** / अंबड आणि घनसावंगी तालुक्यातून जाणारा महत्त्वाचा राज्यमार्ग क्र. ६१ आता खड्ड्यांनी बिचकला आहे. थजठडऊ इ-छघ हायब्रीड ॲम्युनीटी अंतर्गत हा रस्ता कामात आला तरी, रस्त्यावर सिलकोट करणे अजून बाकी आहे.

माजी नगराध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद चंद्र पवार गट तालुका अध्यक्ष नंदकुमार देशमुख यांनी मंत्री रस्ते वाहतूक व महामार्ग विभाग, भारत सरकार, नितीन गडकरी यांना निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की,

एप्रिल २०२५ पासून सिलकोटचे काम सुरू होणार होते, असे इंजिनीअर्स सातत्याने सांगत होते; पण जून-जुलैतही काही झालं नाही. आता पावसाचे कारण देऊन काम ढकलले जात आहे.

सध्या रस्ता जागोजागी उखडलेला आहे, खड्डे पडले आहेत, आणि पावसाच्या पाण्यामुळे खड्ड्यांचे नुकसान वाढते आहे. अभियंत्यांनी व एजेन्सींनी खड्डे भरण्याचे आश्वासन दिले तरी प्रत्यक्षात फक्त डस्ट टाकून तात्पुरते बुजवले जात आहे, जे पावसाने लगेच वाहून जाते आणि खड्डे जशास तसे दिसतात.

निवेदनात म्हटले आहे की, गुत्तेदार एजेन्सी आणि सरकारी अभियंते यांच्या दुर्लक्षामुळे रस्ता अधिक खराब होत आहे. त्यामुळे लोकांना भविष्यात रस्त्याच्या खराब अवस्थेला सामोरे जावे लागू नये, म्हणून खड्डे नियमानुसार भरणे आणि त्यानंतर सिलकोट करणे ही तातडीची गरज आहे.

निवेदनात सरकारकडून या कामाला प्राधान्य देऊन खड्डे भरून सिलकोट करण्याचे आदेश द्यावे, अशी नम्र मागणी केली आहे.

## कन्नड तालुका पंचायत समिती आरक्षण सोडत जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड / उदय कुलकर्णी**/ कन्नड तालूका विभागातील सन - २०२५ मध्ये होणाऱ्या पंचायत समितीची आरक्षण सोडत दि.१३ ऑक्टोंबर रोजी दुपारी ठीक- १२ वजता उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांचे अध्यक्षतेखाली तहसील कार्यालय कन्नड येथे एका १० वर्षीय बालक शेख. मुसद्दीक शेख.मुजक्कीर याचे हस्ते चिठ्ठी कडुन खालील प्रमाणे आरक्षण काढण्यात आले आहे.

यावेळी तहसीलदार विद्याचरण कडवकर,पं.स.गटविकास अधिकारी डॉ.ओमप्रकाश रामावत,नायब तहसीलदार श्री.दिलीपकुमार सोनवणे,नायब तहसीलदार प्रशांत काळे,बेग हे अधिकारी वर्ग उपस्थित होते.

# मंत्रीमंडळ निर्णयाची अंमलबजावणी न केल्यामुळे शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांची दिवाळी शिक्षण मंत्राच्या घरी- अनिल मिसाळ

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी**/ महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळाने बैठकीत निर्णय घेऊन शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांच्या मानधनात रू.१,०००/- वाढ व रु.२,०००/- दिवाळी भाऊबीज वाढ केल्याची घोषणा केली होती. त्या निर्णयाची आज पर्यंत अंमलबजावणी केलेली नाही.महाराष्ट्रात वर्ग ०१ ते ०८ पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मध्यान पोषण आहार शिजवुन देणाऱ्या विधवा, परितक्ता,घटस्फोटीत,दलीत, ओबीसी, अल्पसंख्यांक व गरीब घरातील जवळपास १,७०,४२७ महिला व पुरुष कार्य करीत आहे. ह्या कामगारांना दररोज सहा तास काम करावे लागते व ह्या मोबदल्यात त्यांना दरमहा फक्त रु. २,५००/- म्हणजे ८३/- रु. रोज दिल्या जातो. तेही वर्षातुन दहा महिणे मिळतात.

ह्याच कामाचे केरळ राज्यात रु.१८,०००/-, पासष्ट वर्षा वरील कामगारांना सेवा समाप्तीच्या वेळी रु.१,००,०००/- सानुग्राह अनुदान, त्याच कुटुंबातील व्यक्तींला कामावर घेण्याची सोय,कर्नाटक राज्या प्रमाणे सेवानिवृत्ती वेतन, तामीळनाडु, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड व इतर राज्यात १२ महिण्याचे मानधन दिले जाते परंतु महाराष्ट्रा सारख्या पुरोगामी राज्यात अत्यल्प मानधन देऊन कामगारांची उपासमार केली जात आहे.

महाराष्ट्रातील कामगारांना वरील लाभ मिळण्याच्या दृष्टीने शालेय पोषण आहार कर्मचारी संघटना (सिटु) च्या वतीने दि.०५ सप्टे २०२३, दि.२८ फेब्रु.२०२४ तसेच वेळोवेळी आंदोलन केले परंतु मागण्या मान्य न केल्यामुळे आझाद मैदान, मुंबई येथे धरणे - आंदोलन करण्यात आले त्यावेळी महाराष्ट्र राज्य मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय घेऊन मानधन वाढ व दिवाळी भाऊबीज देण्याचा निर्णय घेण्यात आला होता परंतु त्याची अंमलबजावणी आज पर्यंत न केल्यामुळे दि.१५ ऑक्टों. २०२५ पासुन महाराष्ट्रातील सर्व शालेय पोषण आहार कर्मचारी कॉ. डॉ.डी. एल.कराड, राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा राज्याध्यक्ष सिटु,कॉ. ड.एम.एच.शेख राज्य महासचिव सिटू,आमदार कॉ. विनोद निकोले, कॉ.डॉ.अशोक थोरात,राज्य सरचिटणीस, म.रा., कॉ. प्रा.ए. बी. पाटील, राज्याध्यक्ष फेडरेशन, सौ. मिरा शिंदे, मधुकर मोकळे ह्याच्या नेतृत्वात मा. ना. दादासाहेब घुसे, शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या मालेगाव जि.नाशिक येथील घरी मागण्या मान्य होईपर्यंत धरणे आंदोलन करुन दिवाळी साजरी करण्यात येईल.

जालना जिल्ह्यातील सर्व शालेय पोषण आहार कर्मचारी संघटनेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शालेय पोषण आहार कामगार संघटनेचे राज्य सचिव तथा जिल्हा सरचिटणीस ड.अनिल मिसाळ, शेषराव कान्हेरे,युनुस पठाण,यादवराव दिघे,बाबासाहेब पाटोळे, कृष्णा काटकर,सुधाकर छडीदार, कृष्णा सवडे, सुभाष पाटोळे, मीरा पुंगळे, गयाबाई वाघ,लता वीर, सावित्रा इसापी, सरस्वती मगर, चंपाबाई दाभाडे,यशोदा देशमुख, अशोक साळवे, गोविंद चांदगुडे, मीरा खरात,योगेश फुसे, प्रतिभा आहेर, शिवाजी बोडखे,नंदाबाई बनगया जिल्हा कमेटी सदस्य, इत्यादीसह राज्य व जिल्हा पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# नालंदा धम्मज्ञान स्पर्धा परीक्षा उत्साहात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ नालंदा बुद्ध विहार, नागेवाडी (जि. जालना) येथे रविवारी दुपारी बारा ते दोन या वेळेत नालंदा धम्मज्ञान स्पर्धा परीक्षा मोठ्या उत्साहात पार पडली. या परीक्षेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून एकूण २५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. ही परीक्षा भिक्खू शिवली थेरो



लिखित बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथावर आधारित १२०० पेक्षा अधिक प्रश्नोत्तरांवर आधारीत होती. स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये धम्माविषयीची जिज्ञासा, स्पर्धात्मक भावना आणि अध्ययनाची आवड निर्माण करणे हा होता. परीक्षेचे मार्गदर्शन आणि आयोजन भिक्खू शिवली थेरो व भिक्खू धम्मधर थेरो यांनी केले. दोघांनीही विद्यार्थ्यांना संबोधित करताना धम्माचे शिक्षण केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक आणि नैतिक मूल्ये रुजवण्यासाठी अत्यावश्यक असल्याचे सांगितले. तसेच या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भविष्यातील विविध स्पर्धा परीक्षांसाठी तयारीची दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या धम्मज्ञान स्पर्धेच्या आयोजनात स्थानिक कार्यकर्ते आणि शिक्षकवर्गाने मोलाचे सहकार्य केले. सदानंद तवले, प्रमोद कुमार डोंगरदिवे, निकाळजे सर, काकडे मॅडम, हिवाळे मॅडम, इंगोले सर, डावखरे सर आणि भालेराव सर यांनी पर्यवेक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली. त्यांच्या संयोजनामुळे परीक्षा शिस्तबद्ध आणि सुरळीत पार पडली. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरणाचे आयोजन करण्यात येणार असून, परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना लवकरच विशेष पारितोषिकांनी गौरविण्यात येणार आहे. नागेवाडी परिसरात या परीक्षेबाबत उत्सुकता आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

या उपक्रमाद्वारे नालंदा बुद्ध विहाराने समाजातील युवक आणि विद्यार्थ्यांमध्ये बौद्ध धम्माचे ज्ञान, अध्ययनाची आवड आणि आत्मविकासाची प्रेरणा जागविण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813